माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये**
**प्राप्त झालेले द्वितीय अपील**

**अपील क्रमांक : १४७/२०२२**

**अपिलार्थी** – श्री. राजकुमार दादुजी राउत

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय, गोरेगाव, ता. गोरेगाव, जि. गोंदिया**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय, गोरेगाव, ता. गोरेगाव, जि. गोंदिया**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०३.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **अनुपस्थित** |

| **मूळ अर्जाचा दिनांक** | **जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक** | **प्रथम अपीलाचा दिनांक** | **प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक** |
|---|---|---|---|
| २६.१०.२०२१ | १७.११.२०२१ | ३०.११.२०२१ | ०६.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि.२६.१०.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे कार्यालय खनिकर्म विभाग क्र. अका/खनिज/कावि ६७२/२०२०, दि. १२.१०.२०२० नुसार दंडात्मक कार्यवाही केल्याचा अहवाल मिळण्याबाबत" माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, "मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, गोरेगाव यांचे आदेश दि. १८.१०.२०२१ अन्वये आपले जोडपत्र अ दि. २६.०८.२०२१ नुसार या कार्यालयाचे पत्र क्र. कलि/प्रस्तु-१/कावि-९०२, दि. २२.१०.२०२१ अन्वये पुरविण्यात आलेली आहे. तरी या व्यतिरिक्त नेमकी कोणती माहिती हवी आहे त्याबाबत आपण दि. २४.११.२०२१ ला दु. २.०० वाजता या कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे निरीक्षण करावे जेणे करून आपणास माहिती पुरविणे सोयीचे होईल", असे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. ३०.११.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "जोडपत्र अ नुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून अपिलार्थींचे प्रथम अपील फेटाळले आहे.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)नुसार आयोगाकडे **दि. १४.०१.२०२२** रोजी "जोडपत्र अ नुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही" असे कारण नमूद करून

द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. १९.०१.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. ०५.०३.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, श्री. राजकुमार राउत उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, गोरेगाव, जि. गोंदिया, श्री. एस. एस. कांबळे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी, श्री. राजकुमार दादुजी राउत यांनी दि. २६.१०.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे कार्यालय खनिकर्म विभाग यांच्या दि. १२.१०.२०२० रोजीच्या पत्रानुसार दंडात्मक कार्यवाही केल्याचा अहवाल मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नसल्याचा आक्षेप नोंदवित दि. ३०.११.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर दि. ०६.०१.२०२२ रोजीच्या पारित आदेशात अपिलकर्त्यांचा अपील अर्ज फेटाळण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.११.२०२१ रोजी उपस्थित राहून कागदपत्रांचे निरीक्षण करून हवे असलेले दस्तावेज प्राप्त करण्याबाबत सूचित केले होते. तसेच प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीसही ते हजर नसल्याचे नमूद करीत उपलब्ध असलेली माहिती प्राप्त करण्यात त्यांना स्वारस्य नसल्याचा निष्कर्ष नोंदवित प्रस्तुत अपील अर्ज निकाली काढलेला आहे. त्याविरुध्द श्री. राउत यांनी द्वितीय अपील अर्ज दाखल केला असून त्यात जोडपत्र अ नुसार माहिती दिली नसल्याचे व याबाबतीत चौकशी अहवाल प्रदान केला नसल्याचे नमूद केले आहे. याबाबतीत खनिज उत्खननाबाबत त्यांनी केलेल्या दि. १४.०९.२०२० रोजीच्या तक्रार अर्जावर जर जिल्हाधिकारी कार्यालय (खनिकर्म विभाग) यांच्यावतीने कारवाई करण्यात आली असल्यास विशेषत: दि. १२.१०.२०२० रोजी जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांचे तहसिलदार, गोरेगाव यांना अग्रेषित केलेल्या पत्रानुसार कार्यवाही केली असल्यास अभिलेखावर उपलब्ध असलेली कलम २ (च) नुसार देय असलेली कागदपत्रे अपिलार्थीस तात्काळ व विनामुल्य देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून, प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०५.०३.२०२४**

जावक क्रमांक ----4744---------------दिनांक ---16 AUG 2024-----------------------

c:\users\rma\desktop\prajakta\appeal order\5.3.2024\147-2022.docx